नपड-१
दस्त क्र. 13280 /२०२२
9 — 20

(53)

CHALLAN
MTR Form Number-6

| | | | |
|---|---|---|---|
| GRN [illegible] | BARCODE | Date [illegible] | Form ID [illegible] |

| | | | |
|---|---|---|---|
| Department | Inspector General Of Registration | Payer Details | |
| Type of Payment | Stamp Duty<br>Registration Fee | TAX ID / TAN (If Any) | |
| | | PAN No.(If Applicable) | [illegible] |
| Office Name | NPD_NIPHAD SUB REGISTRAR | Full Name | CHANDRASHEKHAR DNAYNESHWAR SHINDE |
| Location | NASHIK | | |
| Year | 2022-2023 One Time | Flat/Block No. | GAT NO 478 |
| Account Head Details | Amount In Rs. | Premises/Building | |
| 0030046401 Stamp Duty | 144300.00 | Road/Street | OUT OF AREA 0 H 60 R |
| 0030063301 Registration Fee | 8000.00 | Area/Locality | KOTAMGAON |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 2 2 3 0 6 |
| | | Remarks (If Any)<br>SecondPartyName=DATTATRAY SAKHARAM URF SAKHAHARI SHIRSATH~ | |
| | | Amount In Words | One Lakh Fifty Two Thousand Three Hundred Rupees Only |
| Total | 1,52,300.00 | | |

SEAL OF THE SUB-REGISTRAR GR-I NIPHAD-1

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Payment Details | BANK OF MAHARASHTRA | FOR USE IN RECEIVING BANK | | |
| Cheque-DD Details | | Bank CIN Ref. No. | 02300042022113074165 | 001153171 |
| Cheque/DD No. | | Bank Date RBI Date | 30/11/2022-08:32:53 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | BANK OF MAHARASHTRA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | Not Verified with Scroll | |

Department ID :
Mobile No. : 0000000000

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

Shinde

Krushnadhara Farmers Producer Co. Ltd.
Reg.No. U01100MH2021PTC371516
Date : 15/11/2021
Khadak Malegaon Tal.: Niphad Dist.: Nashik


Print Date 30-11-2022 08:33:02

OFFICE OF THE SUB-REGISTRAR GR-I NIPHAD-I
दुय्यम निबंधक श्रेणी-१, निफाड-१, जांचे कार्यालय

(54)

नफड-१
दस्त क्र.(3280 /२०२२)
3 — 26

मुदत :- २९ वर्ष
ई चलन स्टॅम्प :- १,४४,३००/
नोंदणी फि रु :-८०००/-

भाडेपट्टा करारनामा

मौजे कोटमगांव ता.निफाडयेथील मिळकतीचा २९ वर्ष मुदतीचा करारनामा आज दिनांक ३०/११/२०२२ रोज बुधवार ते दिवशी निफाड मुक्कामी

| | |
|---|---|
| कृष्णधारा फामर्स प्रोडयुसर कंपनी लि.<br>पॅन नं AAJCK1498C<br>तर्फे चेअरमन<br>श्री.चंद्रशेखर ज्ञानेश्वर शिंदे<br>वय-२४ धंदा-शेती व्यापार<br>आधार नं ९६८५ ८९९६ ५९२४<br>पॅन नं LVQPS6166K<br>रा.खडकमाळेगांव ता.निफाड जि. नासिक<br>मो.नंबर | -- लिहुन घेणार भाडेकरू |

यांसी

| | |
|---|---|
| श्री.दत्तात्रय सखाराम उर्फ सखाहरी शिरसाठ<br>वय-६८ धंदा- शेती<br>रा.कोटमगांव ता.निफाड जि.नासिक<br>आधार नं ६४२८ २०७१ २३२६<br>पॅन नं HRDPS8806P | -- लिहुन देणार मालक |

Krushndhara Farmers Producer Co. Ltd.
Reg.No. U01100MH2021 PTC371516
Date : 15/11/2021
Khadak Malegaon Tal.: Niphad Dist.: Nashik

कारणे मी सदरचे खालील वर्णन केलेले मिळकतीचे भाडेपट्टा करारनामा मुदत वर्ष २९ करीता करारनामा लिहुन देतो की,

१. मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा नासिक पोट तुकडी तालुका निफाड पैकी कोटमगांव येथील शिवारातील शेतजमीन मिळकत गट नंबर ४७८ यांसी क्षेत्र १हे.२१ आर, पो.ख.०हे.४० आर एकुण क्षेत्र १हे.६१ आर, आकार रू १.८७ पैसे यापैकी लिहुन देणार यांचे मालकीचे क्षेत्र १हे.०१ आर पो.ख.०हे.१८ आर आकार रू १.५६ पैसे यापैकी लिहुन घेणार यांना भाडे कराराने दिलेले पुर्वेकडील क्षेत्र ०हे.६० आर आकार रू ०.९२ पैसे

नफड-१
3260/2022
४ — २०

SEAL OF THE SUB-REGISTRAR NIPHAD-1

.. २ ..

अशी चतु:सिमा

पुर्वेस :- ओहळ

पश्चिमेस :- याच गटातील उर्वरीत क्षेत्र

दक्षिणेस :- ग.नं ४७०

उत्तरेस :- रस्ता

तसेच सदर मिळकतत असलेले तंदगभुत वस्तु हक्कासह व आतील सर्व चिजवस्तु सह तसेच सदर मिळकतीत जाणेयेणसाठी पुर्वापारचे वागवहिवाटीचे रस्त्याने हक्कासह मिळकत असे.

२. वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत लिहुन देणार याचे स्वतंत्र मालकीची व कब्जेउपभोगाची आहे सदर मिळकतीचे हस्तांतरणाबाबत व भाडेकरार करणेबाबतचा संपुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार लिहुन देणार यांना आहे.

३. लिहुन देणार या कंपनीचा शेती उपयोगी व्यवसाय असुन त्यांचा सीआयएन कंपनी नंबर U01100MH2021PTC371516 असा आहे. सदर कंपनीचा शेतक-याच्या शेती उत्पन्नाद्वारे आर्थिक विकास करण्याच्या उद्देशाने व शेतीपुरक आधारीत व्यवसाय आहे. सदर लिहुन घेणार यांना त्यांच्या शेतीउपयोगी फार्मर प्रोडयुसर कंपनीसाठी अन्नधान्य व प्रक्रीया माल साठवणुक गोदाम, व उत्पादन वाढीसाठी सेवा, मार्गदर्शन केंद्र व शेती पिक उत्पादन घेणे हा आहे. त्या व्यवसायासाठी जागेची आवश्यकता होती याची माहीती मला झाली .त्याप्रमाणे लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांचेकडे सदर मिळकतीपैकी ०हे.६० आर इतके क्षेत्र मुदत २९ वर्षाकरीता भाडेतत्वावर मागणी केली. त्याचप्रमाणे लिहुन देणार यांना देखील रकमेची आवश्यकता असल्याने सदर मिळकत भाडेतत्वावर देणेसाठीची तयारी लिहुन देणार यांनी दर्शविली त्याप्रमाणे लिहुन देणार व घेणार यांचे दरम्यान आपसात सदरमिळकत २९ वर्ष मुदतीकरीता भाडेतत्वावर देणेकामी खालील साक्षीदारासमक्ष अटी व शर्ती ठरलेल्या आहे.

ers Producer Co. Ltd.
Reg.No.
MH2021
C371516
15/11/2021
k Malegaon
: Niphad
: Nashik

SEAL OF THE SUB-REGISTRAR GR-I NIPHAD-I

नफड-१
दस्त क्र.(३२८० /२०२२)
५ — २०



४. सदर भाडेपट्टा करारनाम्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१. लिहुन घेणार यांनी सदर मिळकतीत शेतीउपयोगी फार्मर प्रोड्युसर कंपनीसाठी अन्नधान्य व प्रक्रीय माल साठवणुक गोदाम व उत्पादन वाढीसाठी सेवा, मार्गदर्शन केंद्र व शेती पिक उत्पादन घेणे व शेतीपुरक इ. व्यवसाय करावयाचे आहे. सदरचा व्यवसाय सोडुन इतर कोणताही व्यवसाय करावयाचा नाही ,तो केल्यास सदर करार रद्द होईल.

२. भाडेपट्टा करारनामा मुदत ही दि. ३०/११/२०२२ ते २९/११/२०५१ कालावधी करीता म्हणजेच २९ वर्ष करीता अस्तीत्वात राहणार आहे.

३. भाडेपट्टा करारनाम्याच्या दरवार्षिक भाडयाची रक्कम रू १,६०,०००/– अशी ठरलेली आहे. सदर भाडे रक्कम खालीलप्रमाणे अदा करावयाची आहे.

दि.३०/११/२२ ते २९/११/२०२७ पावेतो वार्षिक भाडे रक्कम रू १,६०,०००/–

दि.३०/११/२७ ते २९/११/२०३२ पावेतो वार्षिक भाडे रक्कम रू १,७२,०००/–

दि.३०/११/३२ ते २९/११/२०३७ पावेतो वार्षिक भाडे रक्कम रू १,८४,९००/–

दि.३०/११/३७ ते २९/११/२०४२ पावेतो वार्षिक भाडे रक्कम रू २,१२,६३५/–

दि.३०/११/४२ ते २९/११/२०४७ पावेतो वार्षिक भाडे रक्कम रू २,४४,५३०/–

दि.३०/११/४७ ते २९/११/२०५१ पावेतो वार्षिक भाडे रक्कम रू २,९३,४३६/–

वरीलप्रमाणे भाडे रक्कम अदा करावयाची असुन सदर भाडयाची रक्कम लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना दर वर्षाचे ३१ मार्च आत लिहुन देणार यांचे बँक खात्यात आरटीजीएस ,फोनपेद्वारे अदा करावयाची आहे त्यात कोणताही कसुर करावयाचा नाही सदर ठरलेप्रमाणे भाडे रक्कम लिहुन देणार यांना अदा न केल्यास सदर करार रद्द होईल ही या कराराची महत्वाची अट आहे व हे लिहुन देणार व घेणार यांना मान्यव कबुल आहे.

Krushidhan Farmers Producer Co. Ltd. Reg.No. U01100MH2021PTC371516 Date: 15/11/2021 Khadak Malegaon Tal.: Niphad Dist.: Nashik

५. सदर करारनाम्याच्या मुदतीपावेतो मिळकतीचा ताबा लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यां... दिलेला आहे. सदर मुदतीपावेतो सदर व्यवसायासाठी आवश्यक असणारे पत्र्याचे शेड अ... ते आवश्यक असेल ते बांधकाम करणेस, ज़मीनीची लेव्हल करणे त्यासाठी मुरुम,माती टाकणेस लिहुन देणार यांची कोणतीही हरकत राहणार नाही.

६. सदर मिळकतीवर येणारे नैसर्गिक संकट जसे गारपीट, वादळ, अतिवृष्टी इ त्यामुळे होणारे नुकसान याची व त्याकामी होणा–या खर्चाची व परीणामाची सर्वस्वी जबाबदारी लिहुन घेणार याची राहील त्याचेशी लिहुन देणार यांचा काहीएक संबध अथवा जबाबदारी राहणार नाही असे लिहुन देणार व घेणार यांचेत आपसात ठरलेले आहे.

७. लिहुन देणार यांना त्यांचे व्यवसायासाठी लागणारे विविध परवाने/परवानग्या/नाहरकत दाखले लिहुन घेणार यांनी योग्य त्या शासकीय कार्यालयातुन त्यांचे स्वत:चे नांवाने काढावयाचे आहे, मात्र त्यास लिहुन देणर यांचे संमतीची आवश्यकता असल्यास लिहुन देणार यांनी संमती दयावयाची आहे.

८. लिहुन घेणार यांनी व्यवसायासाठी लागणारी ग्रामपंचायत एनओसी अथवा परवानगी लिहुन घेणार यांनी काढावयाची आहे परंतु त्यासाठी आवश्यकता असणारे कागदपत्रे, सहया संमत्या लिहुन देणार यांनी दयावयाचे आहेत.

Krushnadhara Farmers Producer Co. Ltd.
Reg.No. U01100MH2021 PTC371516
Date : 15/11/2021
Khadak Malegaon Tal.: Niphad Dist.: Nashik

९. सदर करारनाम्याचे मुदतीपावेतो मिळकतीवर होणारे अथव व्यवसायाकामी होणारे वाद,विवाद कोणत्याही प्रकारे गुन्हे, घात,अपघात इ. सर्वस्वी जबाबदारी लिहुन घेणार यांचीच राहील असे आपसात ठरलेले आहे.

१०. उपरोक्त कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये लिहुन घेणार यांनी कोणत्याही बेकायदेशिर चिजवस्तु, स्फोटक वस्तुचा अंमली पदार्थाचा साठा, लागवड करावयाची नाही सदर मिळकतीत बेकायदेशिर बैठका, बेकायदेशिर व्यवसाय करावयाचा नाही असे आपसात ठरलेले आहे.

NIPHAD-1

नपड-१

दस्त क्र. 3280/2022

७ — २०

(56)

११. सदर व्यवसायासाठी लागणारे पाणी व तत्सम वस्तु यासाठीची तजवीज लिहुन घेणार यांनी स्वत: करावयाची आहे.

१२. सदर करार करतेवेळी मिळकत लिहुन देणार यांनी सुस्थितीत दिलेली आहे त्यामुळे सदर करारनामा संपुष्टात आलेवर मिळकत लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना सुस्थितीत द्यावयाचे आपसात ठरलेले आहे. सदर मिळकतीवर लिहुन घेणार यांनी केलेले बांधकाम, पत्र्याचेशेड, मजुरांसाठीच्या खोल्या इ. पुर्ण बांधकामे लिहुन घेणार स्वखर्चाने काढुन घेवुन मिळकतीची लेव्हलिंग करून मिळकतीचा कब्जा लिहुन देणार यांना परत देण्याचे आपसात ठरलेले आहे.

१३. सदर मिळकत ही लिहुन देणार यांनी २९ वर्ष भाडेतत्वावर दिलेली आहे त्यावर लिहुन घेणार यांनी कोणताही मालकी हक्क, कब्जा सांगावयाचा नाही ,मिळकतीचा मालकी हक्क व कब्जा लिहुन देणार यांचाच राहणार आहे.

१४. सदरची मिळकत ही लिहुन घेणार यांनी फक्त शेतीपुकर जोडधंदा (कांदा साठवणुक व प्रक्रीया विक्री )वापरावयाची आहे.

१६. सदर मिळकत ही केवळ लिहुन घेणार यांना वरील व्यवसायासाठी भाडेपट्टयाने दिलेली आहे. त्यात पोट भाडेकरू म्हणुन मिळकत त्रयस्थ इसमास देण्यास लिहुन घेणार यांना कोणताही कायदेशिर हक्क व अधिकार राहणार नाही.

१७. लिहुन घेणार यांनी मिळकतीचा वापर करतांना शेजारील लोकांना त्रास होईल असे कोणतेही कृत्य करावयाचे नाही.

१८. उपरोक्त कलम १ मधील मिळकतीचा कर,त्या व्यतिरिक्त ग्रामपंचायत कर, कंपनीचे कामकाजामुळे शासनाचा काही दंड झाल्यास ते भरण्याची जबाबदारी लिहुन घेणार यांची राहील . तसेच सदर मिळकतीवर दगड,माती भर टाकणेकामी ,बांधकाम करणेकामी लिहुन देणार यांची कोणतीही हरकत राहणार नाही.

Farmers Producer Co. Ltd.
Reg.No. U01100MH2021 PTC371516
Date : 15/11/2021
Khadak Malegaon
Tal.: Niphad
Dist.: Nashik

१९. सदर मिळकतीवर विजकनेक्शन,टेलिफोन कनेक्शन घेतल्यास त्याचे येणारे विजबिल फोनबिल लिहुन घेणार यांनी भरावयाचे आहे.सदर विजकनेक्शन व टेलिफोन कनेक्शन घेणेकामी लिहुन देणार यांची संमती राहील.

नपड-१
क्रमांक ३२८० /२०२२
८ २०

SEAL OF THE SUB REGISTRAR GR-I NIPHAD-1



२०. भाडेपट्टा करारनामा मालक व भाडेकरु करार नाही सदरचा करार भाडेपट्टा स्वरुपाचा असुन त्यासंबधीचे प्रचलित कायदे व नियम उभयतावर बंधनकारक राहतील.

२१. भाडेपट्टा करारनाम्याच्ये लिहुन देणार व घेणार यांचे दरम्यान मालक अथवा भाडेकरु असे नाते निर्माण होत नाही तसेच लिहुन घेणार यांना या करारनाम्याच्ये उपरोक्त कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही मालकी हक्क व वहिवाट निर्माण होणार नाही अथवा लिहुन घेणार यांनी मिळकतीचे टायटलला इजा पोहचेल असे कोणतेही कृत्य लिहुन घेणार यांनी करावयाचे नाही.

२२. लिहुन घेणार यांनी सदर मिळकत २९ वर्षाचे भाडेपट्टयाचे कराराने घेतलेली आहे त्यामुळे लिहुन घेणार यांनी सदरचा २९ वर्षाचा कार्यकाळ पुर्ण न होताच सदर मिळकतीचा भाडेपट्टा करारनामा रद्द करणेचा प्रयत्न केल्यास त्यांना पुर्ण २९ वर्षाचे उपरोक्त ठरलेप्रमाणे भाडे देणे बंधनकारक राहील.

२३. सदर मिळकतीत विजकनेक्शन, नळकनेक्शन,पाणीसुविधा त्या संबधीत लागणारा सुविधांचे अनामत रक्कम व त्यापोटी लागणारी पुर्तता ही लिहुन घेणार यांनीच करावयाची आहे त्यास लिहुन देणार यांची संमती राहील.

Farmers Producer ... Reg.No. U01100MH2021 PTC371516 Date : 15/11/2021 Khadak Malegaon Tal.: Niphad Dist.: Nashik

२४. सदर सुविधेपाटी असलेल्या थकबाकी, देय रकमा या करार संपलेनंतर तीन महिन्याच्या आत निरंक करुन दयावयाचे आहे

२५. सदर भाडेपट्टा करारनामा लिहुन देणार व लिहुन घेणार यांचेवर तसेच त्यांचेतर्फे हक्क सांगणारे वालवारस व एंजट यांचेवर बंधनकारक राहणार आहे.

सदर करारनाम्याची मुळ प्रत लिहुन घेणार यांचेकडे ठरलेली असुन त्याची सत्यप्रत लिहुन देणार यांचेकडे ठेवलेली आहे.

नफड-१

दस्त क्र. 3200 /२०२२

२०

SEAL OF THE SUB-REGISTRAR GR-I NIPHAD-I

.. ७ ..

येणेप्रमाणे भाडेपट्टा करारनामा दस्त हा लिहुन देणार व लिहुन घेणार यांनी आजरोजी कोणत्याही प्रकारची नशापाणी न करता व कोणत्याही दडपणाला बळी न पडता स्वसंतोषाने व राजीखुषीने दोन साक्षीदारासमक्ष मे.दुय्यम निबंधक सो। निफाड यांचे कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहुन लिहुन व नोंदवुन दिला असे.

हा भाडेपट्टा करारनामा दस्त असे


ता. २०/११/२०२२

निफाड



लिहुन देणार :-----------------

श्री.दत्तात्रय सखाराम उर्फ सखाहरी शिरसाठ



लिहुन घेणार :-----------------

कृष्णधारा फ़ामर्स प्रोडयुसर कंपनी लि.

तर्फे चेअरमन श्री.चंद्रशेखर ज्ञानेश्वर शिंदे

Krushndhara Farmers Producer Co. Ltd. Reg.No. U01100MH2021PTC371516 Date : 15/11/2021 Khadak Malegaon Tal.: Niphad Dist.: Nashik

साक्षीदार :-

१. [illegible] शिंदे
मु.पो. खडक माळेगाव
ता. निफाड जि. नाशिक

२. संदीप मार्तंड ठोंबरे
मु.पो. पिंपळद ता. चांदवड
जि. नाशिक

Krushndhara Farmers Producer Co. Ltd. Reg.No. U01100MH2021PTC371516 Date : 15/11/2021 Khadak Malegaon Tal.: Niphad Dist.: Nashik